माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील
## अपील क्रमांक : २४४३/२०२०

**अपिलार्थी :-** **श्री. नईम अहमद अब्दुल मजीद,**
असीर कॉलनी कार्टर नं. ७ अमरावती, ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**उत्तरार्थी :-** **१.जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी,**
(माध्यमिक) जिल्हा परिषद, अमरावती, ता.जि.अमरावती.
**२.प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी,**
(माध्यमिक) जिल्हा परिषद, अमरावती, ता. जि. अमरावती.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २०.०८.२०२६**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल दिनांक | प्रथम आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १८.०९.२०२० | निरंक | १९.१०.२०२० | निरंक |

अपिलार्थी यांनी दि. **२४.११.२०२०** रोजीच्या अर्जान्वये "*मागितलेली माहिती न मिळाल्यामूळे.*" असे कारण नमूद करुन कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २०.०८.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

व्दितीय अपील सुनावणीस अपिलार्थी श्री. नईम अहमद अब्दुल मजीद उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती एस.एन.साबळे ह्या उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्रीमती प्रिया देशमुख, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी श्री.वामन बोलके व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. विरेंद्र रोडे हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १८.०९.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी *"श्री.फिरोज खान रहेमान खान असोसिएशन उर्दु बॉईज हायस्कुल पठान चौक अमरावती ह्या शाळेत कनिष्ठ लिपीक होते नंतर वरिष्ठ लिपीक झाले नंतर १८.०२.२०११ मध्ये आपल्या कार्यालया तर्फे मुख्याध्यापक पदाची*

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती विभाग

*मान्यता देण्यात आली आपल्या कार्यालयाच्या पत्र क्र. ६०११/२०११ दि. ०५.११.२०११ प्रस्ताव दिनांक ०१.१०.२०११ हे सर्व प्रक्रियेत कोणत्या अटी शर्ती व कागदपत्राचे आधारावर मुख्याध्यापक पदाची मान्यता देण्यात आली ते सर्व कागदपत्रांची प्रमाणीत प्रत देण्यात यावी.*" इत्यादी माहिती व्यक्तीश: मागितलेली आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दिनांक १९.१०.२०२० रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "*माहिती न मिळाल्यामुळे अपिल करण्यात आली*" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.०८.२०२६ रोजी सुनावणी आयोजित केल्याबाबतची नोटीस दि. ०६.०८.२०२६ रोजी निर्गमित केल्याचे दिसून येते मात्र आदेशाची प्रत सादर केलेली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती साबळे सांगतात की, या प्रकरणामध्ये त्यांचेकडे कुठलीही माहिती उपलब्ध नाही. त्या पुढे सांगतात की, आयोगाद्वारे द्वितीय अपील सुनावणीची नोटीस आल्यानंतर विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्रीमती प्रिया देशमुख यांनी अपिलार्थी व असोसिएशन उर्दु बॉईज हायस्कुल अँड ज्यु.कालेज ऑफ आर्ट यांच्या मुख्याध्यापकांची सुनावणी घेतली व अपिलार्थीने मागितलेली माहिती आता त्यांचेकडे उपलब्ध आहे. मात्र मुख्याध्यापकांनी दि. १९.०८.२०२६ रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, अमरावती यांना पत्र दिले की, अपिलार्थीने दि. २९.०६.२०२१ ला प्रतिज्ञापत्राद्वारे व हमी पत्राद्वारे माहिती अधिकाराचा अर्ज मागे घेतला.

वरील बाब लक्षात घेता, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१०) नूसार खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपिलार्थीला द्वितीय अपील चालविण्याचे स्वारस्य नसल्यामुळे प्रस्तुत प्रकरण निकाली काढण्यात येते.

(रविंद्र ठाकरे)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २०.०८.२०२६**

जावक क्रमांक ७०६७ दिनांक 01 OCT 2026

राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती

Vishal D.Ingale-2026/